पान १ वरुन ...

## मैत्रीतील मंदी परवडणारी नाही

लागले आहे. हातात मोबाईल असेल तर माणसांना इतर कोणीही नको असते. म्हणूनच समाजमाध्यमांवर ढीगभर मित्र असणाऱ्यांच्या आयुष्यात मित्रांचा दुष्काळ असतो ही भावना सध्या प्रचलित आहे. माणसे स्वतःत अधिकाधिक गुंतत चालली आहेत. मैत्रीत मंदी होण्याची काही ढोबळ कारणे शोधली जाऊ शकतील का? जसे की, अती अपेक्षा, भावनांची खिल्ली उडवणे, त्या समजून न घेणे, गृहीत धरुन बोलणे, मित्राच्या वैयक्तीक गोष्टी इतरांना सांगणे म्हणजेच त्याचा विश्‍वासघात करणे इत्यादी. तथापि आयुष्यात मित्र नसण्याचे तोटे यापेक्षा जास्त सांगितले जाऊ शकतील. सामाजिक एकटेपणा हृदयरोग, डिमेन्शिया आणि मृत्यूचा धोका वाढवतो. इतरही छोटेमोठे परिणाम होतात. हे परिणाम गंभीर आणि आयुष्य पणाला लावणारे आहेत. एकटेपणाच्या नादात ते पत्करण्यापेक्षा मैत्री जपणे आणि जोपासणेच माणसाच्या हिताचे आहे. कारण माणूस समाजशील प्राणी आहे. विविध सणांच्या आणि उत्सवांच्या माध्यमातून त्याला खतपाणी घातले गेले आहे. कारण व्यावहारिक भाषेत मैत्रीचे अनेक फायदे सांगितले जाऊ शकतील. पण खरी मैत्री या सर्वांच्या परे असते. अनेकजण ती जोपासताना आढळतात. वर उल्लेखिलेली कारणे सहज टाळली जाऊ शकतील. माफ करा.. माफी मागा आणि मैत्रीच्या सुंदर स्मृती निर्माण करा. ते सर्वांच्याच हातात आहे. अर्थात ते घडवून आणण्यासाठी अहंकाराचा आणि अपेक्षांचा त्याग मात्र करावा लागतो. स्वतःला कायम तपासत राहावे लागते. पण एकदा का ही जादूची किल्ली माणसाला गवसली की पु.ल.देशपांडे वर्णन करतात तशी मैत्री फुलते. ‘रोज आठवण यावी असे काही नाही, रोज भेट व्हावी असे काही नाही, एवढेच कशाला रोज बोलणे व्हावे असेही काहीच नाही; पण मी तुला विसरणार नाही ही झाली खात्री आणि तुला याची जाणीव असणे ही झाली मैत्री. शेवटी काय हो भेटी नाही झाल्या तरी गाठी बसणे महत्त्वाचे. ज्यांनी हे जाणले त्यांनी माणसातले माणूसपण जाणले. तेव्हा मैत्री फुलवणेच हिताचे आहे.

## शोधा अन् परत पाठवा!

राबवण्यात येत आहे. भारताने पाकिस्तानी नागरिकांसाठी असलेले सर्व व्हिसा सेवा तात्काळ बंद करण्याचा निर्णय घेतला २४ एप्रिल रोजी घेतला होता. त्यानंतर आता केंद्रीय गृहमंत्रालयाने मोठा निर्णय घेत पाकिस्तानशी संबंधित सर्व व्हिसा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. या संदर्भातील आदेश गृहमंत्रालयाकडून जारी करण्यात आला आहे. गृहमंत्री अमित शाह यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर झालेल्या बैठकीनंतर हा निर्णय घेतला आहे.

## सावरकरांवरील टीका खपवून घेणार नाही!

अशिलाला महात्मा गांधींनी तुमचा विश्वासू सेवक हा वाक्प्रचार वापरला होता हे माहित आहे का? त्यांना माहित आहे का की त्यांच्या आजीनेही (इंदिरा गांधी) सावरकरांना पत्र पाठवले होते? त्यांनी आपल्याला स्वातंत्र्य दिले आणि तुम्ही त्यांच्याशी असे वागता, न्यायालयाने असेही राहुल गांधी यांना सुनावले.

सर्वोच्च न्यायालयाने सध्या या प्रकरणातील कारवाईला स्थगिती दिली असली तर स्पष्ट केले की राहुल गांधी यांनी अशी विधाने पुन्हा करू नयेत. एक गोष्ट स्पष्ट करूयात. पुढे असे आणखी काही विधान केले तर आम्ही स्वतःहून दखल घेऊ. आम्ही आपल्या स्वातंत्र्य सैनिकांवर कोणालाही टिप्पणी करण्याची परवानगी देणार नाही, असा इशारा न्यायालयाने दिला.

# वालखेडा येथे होणारा बालविवाह रोखला, प्रशासन अलर्ट मोडवर

■ धुळे । प्रतिनिधी

शिंदखेडा तालुक्यातील वालखेडा येथे होणारा बालविवाह आज प्रशासनाने रोखला. अक्षयतृतीयेच्या मुहुर्तावर बाल विवाह होऊ नये यासाठी प्रशासन अलर्ट मोडवर आहे.

आज दि. २५ रोजी वालखेडा ता.शिंदखेडा येथे १७ वर्ष वय असलेल्या अल्पवयीन बालिकेचा बालविवाह होत असल्याची तक्रार दुपारी चाईल्ड लाईन १०९८ धुळे येथे प्राप्त झाली होती. त्यानुसार जिल्हा बाल संरक्षण अधिकारी सतिश चव्हाण यांनी नियोजन करुन चाईल्ड लाईनची टिमचे सुपरवायझर अतुल पाटील व मुकेश महिरे यांच्या मदतीने बाल विवाह प्रतिबंध अधिकारी तथा ग्रामसेवक तसेच पोलीस पाटील यांना याप्रकरणी माहिती दिली. तसेच ११२ क्रमांकावर तातडीची मदत म्हणुन माहिती देण्यात आली. तसेच नरडाणा पोलीस ठाण्याशी संपर्क साधुन तात्काळ बालविवाह थांबविण्याची कार्यवाही करण्याबाबत माहिती दिली. त्याप्रमाणे दोन पोलीस हेड कॉन्स्टेबल विवाहस्थळी रवाना केले. त्यानंतर रावसाहेब वाघ, गट विकास अधिकारी, शिंदखेडा यांना सुध्दा माहिती देण्यात आली. प्रकरणाचे गांभीर्य ओळखुन त्यांनी तात्काळ ग्रामसेवक यांना विवाहस्थळी उपस्थित राहण्याचे आदेशीत केले.

ग्रामसेवक आणि स्थानिक यंत्रणांनी बाल विवाह रोखण्याचा प्रयत्न केला असता विरोध करण्यात येत होता. त्याचवेळी पोलीस विभागाने हस्तक्षेप करुन हा बालविवाह असुन विवाह करता येणार नाही. बाल विवाह प्रतिबंध अधिनियम २००६ नुसार जो कोणी बाल विवाह घडवून आणेल अथवा त्यास प्रोत्साहन देईल त्यांचे वर कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल, अशी तंबी दिली. तेव्हा दोन्ही कुटुंब विवाह थांबविण्यास तयार झाले. त्यानंतर मंडप उतरविण्यात आला. बालविवाह थांबविण्याची कार्यवाही केल्यामुळे दोन्ही कुटुंबियांना त्याच दिवशी बाल कल्याण समिती,धुळे यांचे समक्ष उपस्थित करण्यात आले. मुलीचे वय १८ वर्षे पुर्ण झाल्यानंतरच तिचे लग्न करु, असे हमी पत्र संबंधितांकडून लिहुन घेण्यात आले.

बालविवाह थांबविण्याची कार्यवाही करतांना ग्राम बाल संरक्षण समितीचे अध्यक्ष तथा सरपंच शैलजा पाटील, सदस्य तथा पोलीस पाटील दिपाली देसले तसेच पोहेकॉं प्रशांत पाटील आणि गणेश पाटील, चाईल्ड लाईनचे सुपरवायझर अतुल पाटील व मुकेश महिरे यांनी कामकाज पाहीले.

बाल विवाह होत असतांना आपल्या निर्दर्शनास आल्यावर चाईल्ड हेल्प लाईन क्र १०९८ व संपर्क करा. या नंबर संपर्क करणाऱ्या व्यक्तीचे नांव व पत्ता गोपनीय ठेवण्यात येते असे आवाहन करण्यात आले आहे.

# नवापूर येथे विविध दाखल्यांचे वाटप

■ नवापूर । श. प्र. -



छत्रपती शिवाजी महाराज महाराज्यस्व समादान शिबिर २०२५ अंतर्गत नवापूर विविध दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

या शिबिरास तहसिलदार दत्तात्रय जाधव, निवासी नायब तहसिलदार प्रविन मराठे, संजय गांधी निराधार योजनेचे नायब तहसीलदार दिलीप कुलकर्णी, निवडणूक नायब तहसीलदार भक्तराज सोनावणे, नवापूर मंडळ अधिकारी संतोष जाधव, मंडळातील सर्व ग्राम महसुल अधिकारी व महसूल सहाय्यक, महसुल सेवक, मंडळ अधिकारी, महा ई-सेवा केंद्र चालक तसेच विविध विभागांचे कर्मचारी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या शिबिरामध्ये सात-बारा उतारे ६०, खाते उतारे ६०, ड पत्रक २७, वारस अर्ज ६, पुरवठा अर्ज ४२, उत्पन्न अहवाल ५३, उत्पन्न दाखले ५३, जातीचे दाखले ३, संजय गांधी योजनेचे अर्ज -९, आधार नुतनीकरन ५ अशा दाखल्यांचे वाटप करण्यात आले.

या उपक्रमामुळे नागरिकांना त्यांच्या गावातच आवश्यक कागदपत्रे सुलभपणे मिळाली. शिबिराच्या यशस्वी आयोजनाबद्दल उपस्थित अधिकाऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. लोकानी नवापूर तहसिल कार्यालयात जाऊन विविध दाखले यासाठी भेट द्यावी असे आवाहन नायब तहसिलदार दिलीप कुलकर्णी यांनी केले.

# यात्रेला जाणाऱ्या दुचाकीस्वार भावांना ट्रकची धडक ; एक ठार

■ धुळे । प्रतिनिधी

साक्री तालुक्यातील बोडकीखडी येथील यात्रेसाठी दुचाकीवरून निघालेल्या दोन भावांना आयशर ट्रकने जोराची धडक दिल्याने एकाचा मृत्यू झाला. तर दुसरा गंभीर जखमी झाला आहे. ही दुर्घटना दि.२३ एप्रिल रोजी रात्री साडेअकरा वाजेच्या सुमारास सुरत-नागपूर राष्ट्रीय महामार्गावरील बोडकीखडी शिवारात घडली.

गुलतारा (ता. साक्री) येथील लहु कर्मा धनगर (वय ३४) व चंद्रसिंग कर्मा धनगर (वय ३०) हे दोघे भावंडे बोडकीखडी येथील यात्रेसाठी दुचाकीने (क्र. एमएच १८-बीव्ही-१५५०) वरून निघाले होते. त्यादरम्यान त्यांना बोडकीखडी शिवारातील स्वागत हॉटेलजवळ मागून भरधाव वेगाने आलेल्या आयशर ट्रकने (क्र. जीजे-१८-बीव्ही-२०७०) जबर धडक दिली. या अपघातात लहु धनगर याचा जागीच मृत्यू झाला, तर चंद्रसिंग धनगर हा गंभीर जखमी झाला आहे. ट्रक चालक अपघातानंतर वाहन जागीच सोडून फरार झाला असून त्याचे नाव व गाव अद्याप समजू शकलेले नाही. याबाबत कर्मा पिर्या धनगर यांनी दिलेल्या फिर्यादीवरून संबंधित ट्रक चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पीएसआय प्रसाद रौदळ करीत आहेत.

# धुळ्यात ६ पाकिस्तानी हिंदू नागरिक, लांब मुदतीचा व्हिसा असल्यान ते भारतात राहू शकतात

■ धुळे । प्रतिनिधी

जिल्ह्यात सध्या सहा पाकिस्तानी हिंदू नागरिक राहात आहेत, ज्यांपैकी पाच ज्येष्ठ नागरिक १९८७ पासून येथे राहात आहेत. तर एक तरुण विद्यार्थी भाऊसाहेब हिरे मेडिकल कॉलेजमध्ये शिक्षण घेत आहे. जम्मू कश्मीरमधील पहलगाम येथे पर्यटकांवर दहशतवाद्यांनी केलेल्या हल्ल्याच्या घटनेनंतर भारत सरकारने अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. त्यातील निर्णयानुसार, पाकिस्तानी नागरिकांसाठी जारी केलेले सर्व व्हिसा २७ एप्रिलपासून रद्द केले जातील. त्यामुळे सध्या भारतात असलेल्या पाकिस्तानी नागरिकांना त्यांच्या व्हिसा संपण्याच्या आधी भारत सोडण्याची आवश्यकता असल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.तथापि, पाकिस्तानातील हिंदू नागरिकांसाठी लांब मुदतीच्या व्हिसाचा रद्दीकरण लागू होणार नाही. त्यामुळे, या सर्व हिंदू नागरिकांना भारतात राहण्याची परवानगी आहे. धुळे जिल्ह्यातील वरील सर्व ६ संबंधित नागरिकांचे व्हिसा लांब मुदतीचे असून ते हिंदू आहेत, त्यामुळे ते येथे राहू शकतात, असे धुळे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांनी स्पष्ट केले आहे.

# पहलगाम घटनेवर वादग्रस्त पोस्ट; माजी उपसरपंचावर गुन्हा

■ धुळे । प्रतिनिधी

पहलगाम येथील घटनेवर वादग्रस्त पोस्ट केल्याचे निजामपूरच्या माजी उपसरपंचाला चांगलेच महागात पडले आहे. याप्रकरणी ताहीर बेग मिर्झा यांच्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जम्मू काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या अतिरेकी हल्ल्यात अतिरेक्यांनी हिंदू धर्म विचारून २७ पर्यटकांना गोळ्या घालून ठार मारले. मात्र ही घटना खोटी असल्याचे भासविण्याच्या उद्देशाने निजामपूर येथील ताहीर बेग मिर्झा याने फेसबुकवर दोन धर्मांमध्ये वैरभाव, द्वेषभावना आणि धार्मिक तेढ निर्माण होईल, या उद्देशाने आतंकवाद्यांनी त्यावेळी लोकांना धर्म विचारून मारले नाही, असा खोटा मजकूर प्रसारित केला याबाबत जैताणे येथील व्यावसायिक इंद्रजित माळी (वय ३०) यांनी निजामपूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

त्यानुसार ताहीर बेग मिर्झा यांच्याविरुद्ध धार्मिक तेढ निर्माण केल्याप्रकरणी भारतीय न्याय संहिता २०२३ चे कलम ३५३ (२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पीएसआय सोनवणे करीत आहेत.

## कल्याण

| दि. | सोम | मंगळ | बुध | गुरु | शुक्र | शनि |
|---|---|---|---|---|---|---|
| ०३-०३-२०२५ ०८-०३-२०२५ | ७७८ २१ ५८८ | ४६० ०१ ६६९ | ५५८ ८० ६७७ | ३०० ३९ २८९ | १२९ २० ४६० | ३७० ०१ १२८ |
| १०-०३-२०२५ १५-०३-२०२५ | ७८९ ४९ ५६८ | १२५ ८९ ४६९ | ३६९ ८३ १५७ | १५६ २९ १८० | ● | १३० ४४ ७८९ |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | ५५८ ८२ ७७८ | २४४ ०१ २९० | ५७९ १४ ३४७ | १२० ३३ ७८८ | १६० ७० ६७७ | ८८० ६६ २७७ |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | १११ ३३ १३९ | ६७७ ०० ३३४ | ४७० १० ५५० | ८९० ७९ २८९ | २५७ ३४ १५५ | २३४ ९६ ५५६ |
| ३१-०१-२०२५ ०५-०१-२०२५ | १२८ १२ ३३६ | ४६० ०४ ३५६ | ८८० ६६ ३६७ | १७८ ६१ ५६० | १६९ ६२ १३८ | २३५ ०२ ६७९ |
| ०७-०४-२०२५ १२-०४-२०२५ | १८० ९१ ५८८ | २४७ ३६ २६८ | ७८९ ४४ २३९ | २७७ ६३ ६७० | ३४५ २३ २३८ | ४६९ ९३ ६८९ |
| १४-०४-२०२५ १९-०४-२०२५ | २५७ ४० ३८९ | २७० ९६ २६८ | १६९ ६२ ५७० | ५५८ ८० २२६ | ४८९ १५ १६८ | ३५९ ७६ २४० |
| २१-०४-२०२५ २६-०४-२०२५ | २४७ ३५ ५०० | ४६९ ९१ ३३५ | १४९ ४४ २४८ | २९९ ०८ ४५९ | | |

## मिलन डे / मिलन नाईट

| दि. | मिलन डे सोम | मिलन डे मंगळ | मिलन डे बुध | मिलन डे गुरु | मिलन डे शुक्र | मिलन डे शनि | मिलन डे रवि | मिलन नाईट सोम | मिलन नाईट मंगळ | मिलन नाईट बुध | मिलन नाईट गुरु | मिलन नाईट शुक्र | मिलन नाईट शनि |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ०३-०३-२०२५ ०८-०३-२०२५ | २४७ ३७ ६६८ | ११५ ७८ ४६८ | १३५ ९६ १२३ | २३० ५२ १५६ | ५७८ ०२ २३७ | २६० ८१ ४७० | ● | १२६ ९५ ४५६ | १२४ ७० २४४ | ३३० ६७ ८९० | ५७८ ०९ ३७९ | २३७ २६ ६०० | ३६९ ८९ ५६८ |
| १०-०३-२०२५ १५-०३-२०२५ | २३९ ४४ २४८ | ६७८ १३ १४८ | ३४५ २९ १४४ | ७७० ४२ २५५ | ● | १४९ ४७ २७८ | ● | ४६७ ७८ ४५९ | ४५८ ७८ ४७७ | ३७९ ९३ ३४६ | ३४९ ६९ ३७९ | ● | ४९० ३१ १४६ |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | १२० ३६ ११४ | ५७९ १२ ५८९ | ३८८ ९५ १७७ | १३८ २८ ४७७ | ३५९ ७९ १२६ | ५८८ १३ ६७० | ● | ४६७ ७७ २६९ | ११३ ५१ ३८० | ५५८ ८२ १५६ | ४४० ८९ २७० | ४५६ ५५ ४५६ | १२५ ८५ १६८ |
| १७-०३-२०२५ २२-०३-२०२५ | १३८ २८ २६० | ७८८ ३७ २५० | ३४६ ३८ १७० | १६० ७१ ३८० | १४८ ३४ ३५६ | १४५ ०३ ६७० | ● | २९९ ०२ ३४५ | १९९ ९० ३७० | ११२ ४६ ३४९ | १३८ २१ ५६० | ३४५ २३ १३९ | ११६ ८८ ३५० |
| ३१-०१-२०२५ ०५-०१-२०२५ | ४५५ ४५ १५९ | ६७० ३६ ३६७ | २३६ १९ ४६९ | ६८८ २६ ४४८ | ८८९ ५४ ३५६ | १२० ३४ ५९० | ● | २४७ ३७ १७९ | ६९० ५१ १३७ | ३३७ ३३ २४७ | १२० ३७ ४४९ | २०० २३ २४७ | २६० ८४ २३९ |
| ०७-०४-२०२५ १२-०४-२०२५ | ३६६ ५१ २९० | २४७ ३१ ११९ | १५० ६१ ४८९ | १४९ ४० ४७९ | ४४६ ४२ ११० | १६९ ६६ ११४ | ● | २८० ०९ २३४ | ८८० ६५ ६९० | ४५७ ६१ ३८० | १२९ २५ ६९० | ८८० ६४ १५८ | ५९० ४५ १७७ |
| १४-०४-२०२५ १९-०४-२०२५ | ६६७ ९७ ३७७ | १८० ९२ २४६ | ३४७ ४४ १५८ | १५७ ३८ ४५९ | ४५० ९१ १३७ | ५५७ ७२ ५८९ | ● | ३६९ ८० ३३४ | ५६८ ९३ १५७ | १६० ७६ २६८ | १७० ८७ १६० | २४४ ०७ १६० | २४० ६२ ५७० |
| २१-०४-२०२५ २६-०४-२०२५ | २०० २६ ८९९ | ५९० ४१ २४५ | १२८ १७ २७८ | २३७ २० ५७८ | | | ● | १४५ ०५ १६८ | २४६ २८ १८९ | ६८० ४४ १६७ | | | |




# महाराष्ट्र मंगळ कलक्ष यात्रेचे २८ रोजी आयोजन

■ धुळे । प्रतिनिधी

धुळे- महाराष्ट्र मंगळ कलक्ष यात्रेला दि. २८ एप्रिल रोजी सकाळी दहा वाजता बेटावद येथुन सुरुवात होणार आहे, अशी माहिती राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष सुरेश सोनवणे यांनी दिली.

येथील साक्री रोडवरील धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या भवनात आयोजित पत्रकार परिषदेला जिल्हाध्यक्ष सुरेश सोनवणे, गणेश जाधव राष्ट्रवादी युवक, कॉंग्रेस जिल्हाध्यक्ष सुमित पवार, कुणाल पवार, उपस्थित होते.यात्रेचे

बेटावद येथुन नरडाणामार्गे शिंदखेडा येथे स्वागत करण्यात येणार आहे. त्यानंतर दोंडाईचा येथे स्वागत करण्यात येणार आहे त्यानंतर सारंगखेडा येथील दर्शन व नंदुरबार जिल्ह्यात तीन वाजता प्रवेश करणार आहे. उत्तर काशी प्रकाशा येथे स्वागत करण्यात येणार आहे.

यामध्ये ही यात्रा शहिद शिरिष कुमार यांच्या स्मारकास मान वंदना देईल. त्यानंतर दोंडाईचामार्गे जावून चिमठाणे येथील क्रांती स्मारक येथे ५.३० वाजता मानवंदना देण्यात येणार आहे.

सायंकाळी ७ वाजता धुळ्यात आगमन होणार असून खान्देश कुलस्वामिनी एकविरा मातेचे दर्शन व कलश यात्रेचा मुक्काम धुळ्यात होणार आहे.

तर २९ रोजी सकाळी ८.३० वाजता लळींग किल्ला येथे दर्शन, ९ वाजता रोकडोबा हनुमान मंदिर दर्शन व पुजा, १० वाजता ही यात्रा नाशिक जिल्हा येथे प्रयाण करेल. झोडगे येथे १०.३० वाजता दाखल होईल, अशी माहिती यावेळी देण्यात आली.

## नशिबाची परीक्षा

गुरुवार २४/०४/२०२५

*** मिलन डे ***

२१८ ३१५ ५३४ — ५-४ — ६३४ ६८५ ९५६ | सिंगल ६-१-८

जोड १०-८३-६४-७५-२४

*** कल्याण बाजार ***

३५६ ६८० ५३६ — २-७ — ५३९ ६५६ २८५ | सिंगल ६-१-५

जोड ३२-६५-७५-२०-६८

*** मुंबई (मेन) बाजार ***

५४८ ११० ३५८ — ०-७ — ४०१ १७७ ३५१ | सिंगल ३-७-२

जोड ०९-५४-८५-३२-७५

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष शास्त्रावर आधारीत आहे. कोणीही दुरुपयोग करु नये मो.९९७५४७९८२६


## क्लासिफाईड

**मंगळवार २२/०४/२०२५**
मेन बाजार -५५१-१०-२४४
मिलन ना.-२४६-२८-१८९

**बुधवार २३/०४/२०२५**
मेन बाजार -
कल्याण-१४९-४४-२४८
मिलन डे -१२८-१७-२७८
मिलन ना.-

### पाहिजेत

हेअर कटींग सलुन दुकान कामासाठी ट्रेन/अनट्रेन कारागीर पगारी व कमिशन बेसीसवर पाहीजेत. न्हावी समाजाच्या गरिब व होतकरु मुलांना न्हावी या व्यवसायाचे प्रशिक्षण बेसीक पासुन ते प्रोफेशनल सलुन डिप्लोमापर्यन्त मोफत दिले जाईल. तसेच जळगाव व्यतिरिक्त बाहेर गावाच्या मुलांना राहण्याची व जेवनाची व्यवस्था मोफत आहे. फॅमिलीसह राहणाऱ्यांसाठी रुम उपलब्ध आहेत. संपर्क : ९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९ (सीएम-३९६२५१ दि.२०/५/२५)

### खरेदी विक्री

जळगाव शहर परिसरात व जिल्ह्यात, प्लॉट, शेत, फ्लॅट, दुकान, घर, बंगला इ. खरेदी विक्रीसाठी व भाड्याने देणे घेण्यासाठी विश्वासनीय ठिकाण स्वामीकृपा ईस्टेट ब्रोकर जळगाव. आमच्याकडे सुंदर लोकेशन व दर्जेदार क्वॉलिटीचे बांधकाम असलेले गच्चीताबा बंगलोज, स्वस्त भावाच्या, जिरायत, बागायत, रोडटच, एन.ए. झोन शेतजमिनी विकणे आहेत. संपर्क : ९४२३१८५१५६, ९५७९०७४२९९ (सीएम-३९६२५१ दि.२०/५/२५)

### दारुबंदीचा गुरुमंत्र

द ग्रेट साईंटिस्ट... (best doctor & gold medal awarded) डॉ.पालवे ॲडमिट करा... ।। नका करु... पेशंटला सांगा....।। नका सांगू.... पेशंटला आणा.... ।। नका आणू.... * व्यसन पेशंटचे... विश्वास तुमचा... उपचार आमचे... Lifelong व्यसनापासुन १०० टक्के मुक्ती.... सर्व सुविधांनी परिपूर्ण:- * व्यसनमुक्ती Special पॅक, मेडिसीन, इंजक्शन स्प्रे, ड्रॉप, ऑपरेशन, गोळी टाकणे, मंत्रोपच्चार... ॲडमिट सुविधा... * (विशेष) गरिबांसाठी फीमध्ये सवलत... तर आजच संपर्क :- ९५५२६१९७५२. डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव. (६४६२/व्ही.एम./०९/०१/२६)(CRINV-2425JL/CRG00504)

### १००% व्यसनमुक्ती

* गॅरंटीने सोडवा. दारु + गुटखा + सिगारेट + बिडी + मावा + तंबाखु + बार + खैनी + भांग + गांजा + अफिम + जर्दा + ताडी + स्नेकबाईट + व्हाईट पावडर + व्हाईटनर + हिरॉईन + चरस + कोकेन + एमडी + एल.एस.डी.डॉट पेपर + झोपेची गोळी + इंजेक्शन... डॉ. पालवे नशामुक्ती केंद्र, वरणगाव मो.९५५२६१९७५२,www. drpalve nashamuk tikendra.in १००% रिझल्ट. (६४६३/व्ही. एम./०९/०१/२६) (CRINV-2425JL/CRG00503)

### उपचार सर्वांसाठी सर्व आजारांसाठी

जुनाट सर्दी, जुनाट दमा, जुनाट गुडघेदुखी, चालता, बसता, उठता न येणे. जुनाट संधीवात / चिकून गुनिया, जुनाट ॲलर्जी, जुनाट अर्धशिशी, जुनाट मुळव्याध, एचआयव्ही, भुक लागत नाही?, वजन कमी? थकवा जाणवतोय?, LOW CD4 COUNT? उपचार सर्वांसाठी, सर्व आजारांसाठी. भेटा - अहमदनगरचे सुप्रसिध्द डॉक्टर पालवे, वरणगाव मो.नं. ९५५२६१९७५२ (६४६४/व्ही. एम./ ०९/०१/२६) (CRINV-2425JL/CRG00505)

### देशदूत

धुळे आवृत्तीसाठी छोट्या जाहिरातील रु.५/- प्रतीशब्दाप्रमाणे स्वीकारल्या जातील. शब्दाची किमान मर्यादा १५ व कमाल मर्यादा ४०. सतत तीन दिवस दिल्यास चौथ्या, पाचव्या व सहाव्या दिवशी विनामूल्य. जाहिरातीच्या मजकूर दै. ‘देशदूत’च्या छोट्या जाहिरातीच्या फॉर्मवर सुबक अक्षरात लिहून दै. ‘देशदूत’, ‘देशदूत कार्यालय’ राणी मेडीकल शेजारी, ग.नं. ६ ,धुळे ४२४००१. संपर्क धुळे-२३७९१४ फॅक्स २३८९१४.

### सूचना

वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातीतील मजकुराची शहानिशा करुनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात, त्याची ‘देशदूत’ वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदाराकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल ‘देशदूत’ वृत्तपत्र समुहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.